

आपले श्रध्दास्थान

# डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप. बँक लि., अमरावती
## मुख्य कार्यालय,इर्विन चौक,अमरावती



संस्थापक अध्यक्ष
स्व.ॲड.एम.एम.पाटील

## वार्षिक साधारण सभेची सूचना
## सन २०२४-२०२५

बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ५२ वी वार्षिक साधारण सभा रविवार, दिनांक २१/०९/२०२५ रोजी दुपारी १.०० वाजता मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह (परिचर्या महाविद्यालय) अमरावती येथे खालील विषयांचा विचार करण्याकरिता होईल. तरी कृपया सर्व सन्माननीय सभासदांनी सभेस उपस्थित राहण्याचे करावे, ही विनंती.

**सभेपुढील विषय -**

१. मागील दिनांक 01 सप्टेंबर 2024 रोजीच्या वार्षिक साधारण सभेची कार्यवाही वाचून कायम करणे.
२. बँकेच्या दिनांक 31/03/2025 अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा अहवाल वाचून त्यास मंजूरी देणे
३. सन 2024-25 च्या वार्षिक अहवाल, बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेला २०२४-२५ चा लेखा परिक्षित ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजूरी देणे.
४. संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विभागणीस मान्यता देणे.
५. बँकेचे सन 2024-25 चे अंदाजपत्रकातील ओलांडलेली तरतूद मंजूर करणे.
६. बँकेचे संचालक मंडळाने सादर केलेले सन 2025-26 चे अंदाज पत्रक मंजूर करणे.
७. बँकेचा सन 2024-25 चा वैधानिक लेखा परिक्षण अहवाल व त्यावरील बँकेने तयार केलेला दोष दुरुस्ती अहवाल मंजूर करणे
८. सन 2026-27 करीता बँकेसाठी समवर्ती व अंतर्गत लेखा परिक्षकांची नियुक्ती करणेबाबत संचालक मंडळाची शिफारस विचारात घेणे.
९. सन 2025-26 या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखा परिक्षणासाठी सनदी लेखाकार यांची नियुक्ती करण्यासाठी संचालक मंडळाची कार्यवाही मंजूर करणे.
१०. बँकेच्या संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकाकडील कर्जाची नोंद घेणे.
११. बँकेच्या संचालक मंडळाने बँकेचे उपविधीमध्ये सुचविलेल्या दुरुस्तीस मंजूरात देणे.
**१२. मा.अध्यक्षांचे परवानगीने वेळेवर येणारे इतर विषय.**

ठिकाण : अमरावती
दिनांक : ०६/०९/२०२५

संचालक मंडळाचे आदेशावरुन
प्रविण वा. बोंडे
कार्यकारी संचालक

-----

**सूचना**

१) वरील सभेसाठी आवश्यक गणपूर्ती (कोरम) अभावी सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात येईल व तहकूब सभा त्याच ठिकाणी त्याच दिवशी दुपारी १.३० वाजता वरील विषयांवर विचार करण्याकरिता घेण्यात येईल. अशा सभेस गणपूर्तीची गरज असणार नाही.
२) सभासदांना काही सूचना, ठराव इत्यादी सभेपुढे मांडावयाचे असल्यास अथवा बँकेच्या कामकाजासंबंधी प्रश्न विचारावयाचे असल्यास ते कृपया दिनांक १५/०९/२०२५ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत मुख्य कार्यालयात पोहचतील याची काळजी घ्यावी. त्यानंतर आलेल्या किंवा वेळेवर विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणे शक्य होणार नाही. केवळ अहवाल वर्षाशी संबंधीत प्रश्नांची उत्तरे सभागृहात देण्यात येतील. इतर प्रश्नांची उत्तरे बँकेच्या मुख्य कार्यालयामधून प्राप्त करता येतील.
३) सभासदांनी पत्ता बदलला असल्यास तसेच अद्यावत पत्त्याबाबत माहिती बँकेस द्यावी.
४) सभासदांनी वारस नेमला नसल्यास तो नेमण्याचे करावे.
५) अहवालाच्या प्रती बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.
६) ज्या भागधारकांचे बँकेत बचत खाते नाही त्यांनी आपले बचत खाते उघडून घ्यावे.
७) खातेदारांनी संबंधीत शाखेला आपला भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नं.)द्यावा
८) टीडीएस कपात करणे आवश्यक असल्यामुळे पॅन क्रमांक व इमेल (असल्यास) संबंधीत शाखेवर द्यावा.
९) ज्या खातेदाराकडे जीएसटी नं. आहे त्यांनी संबंधीत शाखेवर जीएसटी नं. द्यावा.
१०) बँकेचा २०२४-२५ या वर्षाचा वार्षीक अहवाल बँकेचे संकेत स्थळ www.pducbank.com वर उपलब्ध आहे.

*****